सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ रु. स्वागत मूल्य

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ४९ | गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
१३ नोव्हेंबर

- रवींद्रनाथ टागोर यांना त्यांच्या गीतांजली या साहित्यासाठी स्वीडिश अकादमीने साहित्यातील नोबेल पारितोषिक प्रदान केले.
- वामनराव पटवर्धन यांनी पुढाकार घेऊन पुण्यात अखिल भोर संस्थान प्रजा सभेची स्थापना केली.
- शंकर रामचंद्र आणि मामाराव दाते यांनी देवनागरी लिपी एका मोनोटाइप मशीनवर यशस्वीरित्या स्थापित केली.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## श्री कालभैरव महायाग...!





अमळनेर येथील श्री मंगळग्रह मंदिरात श्री कालभैरव जयंतीनिमित्त बुधवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी आयोजित महायागाच्या पूर्णाहुतीप्रसंगी हवन विधी करताना मानकरी भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा सौ. भैरवीताई पलांडे – वाघ, कॉन्ट्रॅक्टर शुभम पाटील, जळगाव येथील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. जी. एम. पाटील, मोक्षदा वाघ, निलेश महाजन. दसऱ्या छायाचित्रात महायागापूर्वी विश्वातील एकमेव त्रिशुलात्मक स्थित श्री कालभैरव– श्री भैरवी माता मंदिरात श्री कालभैरवजींच्या मूर्तीवर रुद्राभिषेक करताना मानकरी शुभम पाटील. (बातमी व आणखी छायाचित्रे पान ४ वर) (छायाचित्रे : मयूर चौधरी)

# अमळनेर न्यायालय परिसराची दयनीय अवस्था

## पालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सर्वत्र अस्वच्छता; नागरिकांसह वकील त्रस्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर येथे न्याय देवतचे मंदिर म्हणून ओळख असलेला न्यायालयाचा परिसर सद्यःस्थितीत स्वतःच स्वच्छतेच्या बाबतीत न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. या परिसरात सर्वत्र अस्वच्छता, वाढलेले गवत, तुटक्या फरशा, साठलेला कचरा आणि त्यामुळे सर्वत्र पसरलेली दुर्गंधी यामुळे हे ठिकाण अत्यंत किळसवाणे झाले आहे. स्वच्छतेच्या अभावामुळे येथे येणाऱ्या नागरिकांसह वकील मंडळी आणि न्यायालयातील कर्मचारी कमालीचे त्रस्त आहेत.



न्यायालय परिसरात कोणीही प्रवेश केला, तर समोरच दिसतो तो वाहन पार्किंग विभाग. या भागात वाढलेले दाट गवत, झाडा–झुडपांनी व्यापलेली जागा त्यामुळे वाहने उभे करणेही अवघड होते. तुटक्या फरशा आणि सर्वत्र जाणवणारी दुर्गंधी याचा नागरिकांसह वकील व येथील कर्मचाऱ्यांना दररोज सामना करावा लागतो.

याशिवाय न्यायालय आवारात जाळलेला कचरा, ठिकठिकाणी पडलेल्या प्लास्टिक बाटल्या, जुने कागद व जीर्ण वस्तूंचे ढिगारे पाहून ' स्वच्छ भारत अभियान 'ला जणू हरताळच फासल्याचे चित्र दिसते. या घाणीमुळे परिसरात असह्य दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे डासांचा त्रास वाढला आहे. न्यायालयीन कामकाजासाठी येणाऱ्या वकील, कर्मचारी, साक्षीदार व नागरिकांना डासांच्या त्रासाचाही सामना करावा लागत आहे.

एका बाजूला नागरिक न्यायासाठी न्यायालयाच्या दारात येतात, पण दुसऱ्या बाजूला अस्वच्छतेच्या या समस्येमुळे ते आरोग्य धोक्यात घालवत आहेत. मात्र याकडे प्रशासनाचे दुर्लक्षच आहे.

न्यायालयातील सभोवतालच्या झाडा–झुडपांची नियमित छाटणी, कचऱ्याची विल्हेवाट, डासांवर नियंत्रणासाठीची फवारणी, फरशांची दुरुस्ती आणि दररोजची स्वच्छताच नियमित होत नाही. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाकडून तातडीने याकडे लक्ष पुरवून कार्यवाही व्हावी, अशी मागणी नागरिकांसह वकील मंडळींकडून होत आहे.



(छायाचित्रे : योगेश महाजन)



## अश्लील हावभाव करणाऱ्यास चोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात सकाळी साडेअकराच्या सुमारास शाळकरी मुलीकडे पाहून अश्लील हावभाव करणाऱ्या तरुणाला नागरिकांनी जोरदार चोप दिला आहे. जळगाव जनता सहकारी बँकेच्या शाखेनजीक ही घटना घडली. शाळा सुटल्यानंतर संबंधित मुलगी घरी परतत असताना दुचाकीवरून जाणाऱ्या तरुणाने तिच्याकडे पाहून अश्लील हावभाव केले. हा प्रकार तेथे उपस्थित असलेल्या नागरिकांच्याही लक्षात आला. त्यामुळे त्यांनी तत्काळ त्याचा पाठलाग करून जनता बँकेसमोरील भररस्त्यावर त्याला जोरदार चोप दिला. या प्रकारामुळे घटनास्थळी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. या प्रकाराची माहिती पोलिसांनी कळताच ते तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संबंधित तरुणाला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेले. तेथे त्यास समज देऊन सोडून देण्यात आले.

# मुंदडा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सचे ओमप्रकाश मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त अमळनेरमध्ये कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रख्यात मुंदडा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सचे व्यवस्थापकीय संचालक, मुंदडा फाऊंडेशनचे अध्यक्ष, महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तसेच सामाजिक कार्यकर्ते श्री. ओमप्रकाश नारायणदास मुंदडा हे गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी वयाच्या ६४ व्या वर्षांत पदार्पण करीत आहेत. यानिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

अमळनेर शहरात सामाजिकतेचा वसा घेत सेवाकार्य, शिक्षण, बांधकाम क्षेत्र आणि मानवतावादी कार्यातील श्री. ओमप्रकाश मुंदडा यांचे योगदान खूप मोठे आहे. त्यांच्या कार्यातून अनेक जण प्रेरणा घेत सामाजिक तसेच विकासात्मक बाबींमध्ये योगदान देत आहेत. मुंदडा फाऊंडेशन, विविध शिक्षण संस्था, विद्यार्थी वर्ग तसेच अमळनेरकर नागरिकांशी त्यांची आपल्या कार्याद्वारे उत्तम नाळ जुळलेली आहे. दैनिक ' ग्लोबल महातेज ' परिवारातर्फे त्यांना अनेकोत्तम मंगलमय शुभेच्छा!



### आज होणारे विविध कार्यक्रम

सकाळी ७.३० वाजता एन. टी. मुंदडा ग्लोबल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढदिवस सोहळा होईल. ८.०० वाजता श्री स्वामी समर्थ केंद्रात आरती व आशीर्वाद कार्यक्रम, ८.३० वाजता इंदिरा गांधी हायस्कूलमध्ये शाळेच्या नवीन बसचा लोकार्पण सोहळा, ९.०० वाजता स्वतःच्या कार्यालयात मान्यवरांकडून शुभेच्छांचा स्वीकार व गाठीभेटी.

# पालिका निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्याने पोलिस यंत्रणा सतर्क

## अमळनेरसह परिसरात ठिकठिकाणी राबविली जातेय वाहन तपासणी मोहीम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील २४६ नगर परिषदा व ११ नगर पंचायतींचा निवडणूक कार्यक्रम नुकताच जाहीर झाला आहे. त्यानंतर आचारसंहिताही लागू होऊन अमळनेर येथील नगर परिषदेची निवडणूक प्रक्रिया प्रत्यक्षपणे आता सुरू झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर अमळनेरसह तालुक्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी, या उद्देशातून जिल्हा पोलिस प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली शहर व परिसरात ठिकठिकाणी दिवसा व रात्री वाहन तपासणी मोहीम राबविली जात आहे.

या मोहिमेंतर्गत शहरातील प्रमुख रस्ते तसेच ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या विविध रस्त्यांवर ठिकठिकाणी पोलिस पथके तैनात करण्यात आली आहेत. या तपासणीदरम्यान वाहनांची कागदपत्रे, वाहनचालकांकडे असलेले परवाने आणि वाहनांमधून वाहतूक होणारे साहित्य यांची जळगाव व चोपडाकडून येणाऱ्या वाहनांची पैलाड नाका, बोरी नदी पुलानजीक, तर धुळ्याकडून येणाऱ्या वाहनांची अमळनेर शहराच्या प्रवेशद्वारानजीक काटेकोर तपासणी

पान ३ वर



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

' चमकण्याची '
तसेच आपली
व्यक्तिगत, राजकीय,
व्यावसायिक प्रसिद्धी
जाहिरात रूपाने
प्रचंड मोठ्या प्रमाणावर
करण्याची
सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले
महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.

मसाला पान



# अधुरी प्रेमकहाणी : देवानंद आणि सुरैया धर्मामुळे तुटले नाते, शेवटची भेट ठरली वेदनादायी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



बॉलीवूड मध्ये १९४० च्या दशकात अनेक प्रेमकथा घडल्या. मात्र देवानंद आणि सुरैया यांची कहाणी सर्वांत हृदयद्रावक आणि अधुरी राहिली. हिंदू असलेले देवानंद आणि मुस्लिम कुटुंबातील सुरैया यांचे प्रेम इतके गहिरे होते, की ते लग्नापर्यंत पोहोचले असते. धर्म आणि कुटुंबाच्या विरोधामुळे ते तुटले. ही कहाणी प्रेमाच्या त्यागाची आणि सामाजिक बंधनांची एक दुखांतिका आहे.

### प्रेमाची सुरूवात

१९४८ मध्ये ' विद्या ' चित्रपटाच्या सेटवर देवानंद आणि सुरैया यांची भेट झाली. त्या काळात सुरैया यशस्वी अभिनेत्री आणि गायिका होत्या, तर देवानंद आपल्या करिअरची सुरूवात करत होते. ' जीत ', ' शायर ' आणि ' अफसर ' या चित्रपटांत एकत्र काम करताना त्यांचे प्रेम बहरले. सुरैया देवानंदच्या उत्साही व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झाल्या, तर देवानंद त्यांच्या साधेपणा आणि सौंदर्याकडे आकर्षित झाले. दोघे गुप्तपणे भेटायचे, पत्रे लिहायचे आणि प्रेमाची कबुली द्यायचे. देवानंदने नंतर सांगितले, की सुरैय्यासोबतचे दिवस त्यांच्या आयुष्यातील सर्वांत सुंदर क्षण होते.

### धर्माचा अडथळा

प्रेम वाढत असताना सुरैय्याच्या कडक नानी, बदीशाह बेगम यांनी त्याला विरोध केला. त्यांना हिंदू-मुस्लिम विवाह मान्य नव्हता. नानीने सुरैय्याच्या प्रत्येक गोष्टीवर नियंत्रण ठेवले होते; देवानंदला भेटणे किंवा फोनवर बोलणेही बंदी होते. दोघांनी गुप्त भेटी घेण्याचा प्रयत्न केला. मात्र नानीला सर्व कळले. एकदा ' जीत ' चित्रपटाच्या सेटवरून पळून जाऊन लग्न करण्याचा विचार दोघांनी केला. नानीने सुरैय्याला घरी ओढून नेले आणि बंदी घातली.

### वेदनादायी शेवटची भेट

चार वर्षांच्या संघर्षानंतर देवानंद यांनी आपल्या मोठ्या भावाच्या सल्ल्याने करिअरवर लक्ष केंद्रित करण्याचा आणि नाते संपवण्याचा निर्णय घेतला. त्यांची शेवटची भेट सुरैय्याच्या सहा मजली इमारतीच्या टेरेसवर झाली. मागच्या जिन्याने चढत देवानंद तिथे पोहोचले. दोघे एकमेकांना मिठी मारून रडले आणि चार वर्षांच्या प्रेमाला रडत-रडत निरोप दिला. त्यांनी कधीही पुन्हा भेटू नये असा शपथ घेतला. ही भेट वेदनादायी होती, कारण त्यांचे प्रेम धर्माच्या बंधनासमोर हारले.

### प्रेमाचा त्याग आणि परिणाम

यानंतर सुरैय्याने अभिनय आणि गायन सोडले आणि आयुष्यभर अविवाहित राहिल्या. वयाच्या ६४ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. देवानंदने सुरैय्याला ' कायर ' म्हटले. कारण तिने कोर्टात लग्नाला (धर्म बदलण्याच्या अटीसह) नकार दिला. नंतर देवानंदने अभिनेत्री कल्पना कार्तिकशी लग्न केले, पण सुरैय्यावरील प्रेम कायम ठेवले. ते म्हणाले, की जर मी तिच्याकडे परत गेलो असतो, तर माझे आयुष्य वेगळे झाले असते.

### अधुरी कहाणीचा वारसा

देवानंद आणि सुरैया यांची ही प्रेमकथा बॉलीवूडच्या इतिहासातील एक हृदयस्पर्शी. परंतु दुखांत अध्याय आहे. ती दाखवते, की प्रेम कितीही खरे असले, तरी सामाजिक आणि धार्मिक बंधने त्याला तोडू शकतात. आजही ही कहाणी प्रेमाच्या त्यागाची आणि अतूट नात्याची प्रेरणा देते.

# मुंबईचा १९ वर्षीय ध्रव्य शाह : सुपरमेमोरीचा सीईओ; गुगलच्या एआय हेडने घेतली दखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी ध्रव्य शाह याने सुपरमेमोरी या एआय स्टार्टअपच्या माध्यमातून जागतिक स्तरावर यश मिळविले आहे. या स्टार्टअपने ३ दशलक्ष डॉलर्सचे फंडिंग मिळविले आहे. याला गुगलचे एआय हेड जेफ डीन आणि डीपमाइंडचे लोगन किलपॅट्रिक यांच्यासारख्या दिग्गजांचा पाठिंबा आहे.




### सुपरमेमोरी : एआयच्या दीर्घकालीन स्मृती समस्येवर तोडगा

लार्ज लँग्वेज मॉडेल्स अत्यंत प्रगत असले, तरी त्यांना दीर्घकालीन स्मृती राखण्याचे आव्हान आहे. सुपरमेमोरी हे स्टार्टअप या समस्येवर उपाय शोधण्यासाठी स्थापन झाले आहे. त्यांचे तंत्रज्ञान एआयला वेगवेगळ्या सत्रांमध्ये माहिती लक्षात ठेवण्यास आणि पुन्हा वापरण्यास सक्षम करते. हे तंत्रज्ञान यशस्वी झाल्यास डिजिटल सिस्टीम्स आणि वापरकर्ता अनुभवात क्रांती घडवू शकते.

### मुंबई ते सिलिकॉन व्हॅली : ध्रव्यचा प्रवास

मुंबईत जन्मलेल्या ध्रव्यने लहानपणापासूनच तंत्रज्ञान आणि ॲप डेव्हलपमेंटमध्ये रुची दाखविली. समवयस्क आयआयटीसारख्या परीक्षांच्या तयारीत असताना त्याने कोडिंगवर लक्ष केंद्रित केले. त्याने ट्विटर ऑटोमेशन टूल विकसित करून हाइपफ्यूरी या प्लॅटफॉर्मला विकले. अमेरिकेत पोहोचल्यानंतर त्याने ४० आठवड्यांत नवीन प्रकल्पावर काम करण्याचा संकल्प केला. यातूनच सुपरमेमोरीचा पाया घातला गेला. ज्याला सरूवातीला ' एनी कॉन्टेक्स्ट ' म्हणून ओळखले जायचे. हा चॅटबॉट ट्विटर बुकमार्क्ससह संवाद साधण्याची सुविधा देत होता.

# वर्ल्ड कप फायनल मॅचआधी सचिन सरांचा फोन आलेला, एकच वाक्य बोलले की... हरमनप्रीत कौरचा मोठा खुलासा




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय महिला क्रिकेट संघाने घरच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत विजय मिळवून इतिहास रचला आहे. हा भारतीय महिला संघाचा पहिला आयसीसी विश्वचषक आहे.

या विजयात संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिचा मोठा वाटा आहे. विश्वचषक अंतिम सामन्यापूर्वी सचिन तेंडुलकरने दिलेल्या सल्ल्याने हरमनप्रीतला खूप मदत झाली. हरमनप्रीत कौरने नुकताच एक मोठा खुलासा केला आहे. विश्वचषक अंतिम सामन्यापूर्वी तिला अनेक सल्ले मिळाले होते, परंतु महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा सल्ला तिच्यासाठी सर्वांत महत्त्वाचा ठरला. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या ऐतिहासिक अंतिम सामन्यापूर्वी सचिन तेंडुलकरने हरमनप्रीतला फोन केला होता.

हरमनप्रीतने आयसीसी रिव्ह्यूमध्ये सांगितले, की सामन्यापूर्वी सचिन सर यांचा फोन आला होता. त्यांनी आपला अनुभव सांगितला आणि आम्हाला संतुलन राखण्याचा सल्ला दिला. जेव्हा सामना वेगाने चालू असेल तेव्हा थांबून खेळण्याचा प्रयत्न करा, कारण जर तुम्हीही वेगाने खेळलात तर अडखळण्याचा धोका असतो. हरमनप्रीतने त्यानंतर संघातील खेळाडू भेटतो त्यावेळी एकमेकांना वर्ल्ड चॅम्पियन बोलत असल्याचे सांगितले. आम्ही जेव्हाही एकमेकांना भेटतो तेव्हा म्हणतो, की वर्ल्ड चॅम्पियन. हा एक वेगळा अनुभव आहे. आम्ही वाट पाहत होतो, की असा अनुभव कधी येईल. माझे आई-वडील तिथे होते. त्यांच्यासमोर विश्वचषक जिंकण्याचा क्षण खास होता. लहानपणापासून ते मला हेच ऐकत आले आहेत की मला भारताची जर्सी घालायची आहे, देशासाठी खेळायचे आहे, कर्णधारपद सांभाळायचे आहे आणि विश्वचषक जिंकायचा आहे.

या विजयामुळे भारतीय महिला क्रिकेट संघाने एक नवीन इतिहास लिहिला आहे. घरच्या मैदानावर खेळताना चाहत्यांचा पाठिंबा आणि खेळाडूंचे उत्कृष्ट प्रदर्शन यामुळे हे शक्य झाले. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली संघाने अत्यंत कठीण परिस्थितीतही संयम राखला आणि अंतिम सामन्यात विजय मिळवला. सचिन तेंडुलकर यांच्यासारख्या दिग्गजाचा सल्ला संघासाठी प्रेरणादायी ठरला. विश्वचषक जिंकल्यानंतर खेळाडूंच्या चेहऱ्यावरील आनंद आणि समाधान स्पष्ट दिसत होते. १६ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीनंतर मिळालेले हे यश हरमनप्रीतसाठी खूप मोलाचे आहे. तिच्या आई-वडिलांसमोर विश्वचषक उंचावण्याचा क्षण तिच्यासाठी अविस्मरणीय होता. लहानपणापासून पाहिलेले स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद तिच्या बोलण्यातून जाणवत होता.



# कारल्याचे चटकदार लोणचे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



कारले चवीला कडू असले, तरी त्याचे आरोग्यदायी गुणधर्म खूपच महत्त्वाचे आहेत. विशेषतः मधुमेही रुग्णांसाठी, कारण त्याचा कडूपणा रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करतो. कारल्याची भाजी खाणे अवघड वाटत असले, तरी त्याचे लोणचे बनवून खाल्ल्यास कडूपणा कमी होतो आणि ते चविष्ट लागते. हे लोणचे अगदी तोंड फिरविणाऱ्यांनाही आवडीने खायला लावेल.

**साहित्य (१५० ग्रॅम लोणच्यासाठी) :**

- १ मोठे कोवळे पांढरे कारले (अंदाजे १५० ग्रॅम)
- १.५ टेबलस्पून तयार लोणचे मसाला
- १.५ टेबलस्पून लाल तिखट
- मीठ (चवीनुसार)
- १.५ टेबलस्पून तिळाचे कूट
- १ टेबलस्पून तेल
- १.५ लिंबाचा रस
- १ टेबलस्पून गूळ पावडर
- टीस्पून हिंग
- टीस्पून मोहरी (फोडणीसाठी)

**कृती :** १) कारले स्वच्छ धुवून, कोरडे करून उभे पातळ काप करावेत. २) कापांवर मीठ लावून एक दिवस (किमान १२ तास) ठेवावे, जेणेकरून पाणी निघेल. ३) दुसऱ्या दिवशी कापांमधील पाणी काढून टाकावे. ४) एका वाडग्यात कारल्याचे काप, लोणचे मसाला, लाल तिखट, तिळाचे कूट, गूळ पावडर आणि चवीनुसार मीठ घालून नीट एकजीव करावे. ५) कढईत १ टेबलस्पून तेल तापवून त्यात मोहरी आणि हिंग घालून फोडणी तयार करावी. ६) फोडणी थंड झाल्यावर ती मिश्रणात घालावी. त्यात लिंबाचा रस मिसळून सर्व एकजीव करावे. ७) चटकदार आणि कमी कडू असे कारल्याचे लोणचे तयार आहे.

**सर्व्हिंग टीप :** * हे लोणचे जेवणासोबत किंवा पोळी-भाकरीबरोबर खावे. * हवाबंद डब्यात ठेवल्यास ५-७ दिवस टिकते (थंड ठिकाणी ठेवावे).

# आईएएस अंबिका रैना की सफलता प्रेरणादायक

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जम्मू-कश्मीर के श्रीनगर की निवासी अंबिका रैना एक तेज-तर्रार महिला आईएएस अधिकारी हैं । जिनकी गिनती देश की प्रेरणादायक हस्तियों में होती है। उनकी सफलता की कहानी हर उस व्यक्ति के लिए प्रेरणा है। जो कठिनाइयों के बावजूद अपने सपनों को साकार करना चाहता है।



### तीसरे प्रयास में यूपीएससी में सफलता

अंबिका की यात्रा आसान नहीं थी। उन्होंने यूपीएससी परीक्षा में दो बार असफलता का सामना किया, लेकिन हार नहीं मानी। तीसरे प्रयास में उन्होंने न केवल परीक्षा पास की, बल्कि ऑल इंडिया १६४ वीं रैंक हासिल कर अपने सपने को साकार किया।

### जॉब ऑफर ठुकराकर चुनी सिविल सेवा

अंबिका ने गुजरात के अहमदाबाद स्थित सीईपीटी यूनिवर्सिटी से आर्किटेक्चर में ग्रेजुएशन पूरा किया। इसके बाद उन्हें स्विट्जरलैंड के ज्यूरिख में एक कंपनी से इंटर्नशिप के बाद जॉब ऑफर मिला। लेकिन सिविल सेवा के प्रति उनकी प्रतिबद्धता इतनी गहरी थी कि उन्होंने इस आकर्षक ऑफर को ठुकराकर भारत लौटने और यूपीएससी की तैयारी करने का फैसला किया।

### इंटरव्यू की अनूठी तैयारी

यूपीएससी इंटरव्यू की तैयारी के लिए अंबिका ने १०० से ज्यादा उम्मीदवारों के इंटरव्यू देखे और उनके अनुभवों से सीखा। इसके आधार पर उन्होंने अपनी रणनीति तैयार की, जिसने उनकी सफलता में महत्वपूर्ण भूमिका निभाई।

### छात्रों के लिए अंबिका के टिप्स

सफलता प्राप्त करने के बाद एक इंटरव्यू में अंबिका ने कहा, ' इंटरनेट ज्ञान का भंडार है, बस इसे सही तरीके से इस्तेमाल करना आना चाहिए '। यूपीएससी की तैयारी कर रहे छात्रों को उनकी सलाह है कि वे ज्यादा से ज्यादा मॉक टेस्ट दें और पुराने परीक्षा प्रश्नपत्रों को हल करें। यह रणनीति उन्हें परीक्षा पैटर्न को समझने और आत्मविश्वास बढ़ाने में मदद करती है। अंबिका रैना की कहानी दर्शाती है कि दृढ़ निश्चय, कठिन परिश्रम और सही रणनीति के साथ किसी भी लक्ष्य को हासिल किया जा सकता है। उनकी यात्रा न केवल यूपीएससी उम्मीदवारों के लिए, बल्कि हर उस व्यक्ति के लिए प्रेरणादायक है, जो अपने सपनों को पूरा करने के लिए संघर्ष कर रहा है।

# रिक्षाचालकाच्या मुलाने टोमण्यांना दिले यशाने उत्तर; ११ व्या वर्षी ठरवले स्वप्न

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



वाराणसी येथील आयएएस अधिकारी गोविंद जयस्वाल यांची कहाणी लाखो तरुणांना प्रेरणा देणारी आहे. रिक्षाचालकाच्या मुलाला लोकांनी टोमणे मारले तसेच त्याची आणि कुटुंबीयांची खिल्ली उडविली. मात्र गोविंद जयस्वाल यांनी खचून न जाता यशाने सर्वांना चोख उत्तर दिले. आज ते भारत सरकारच्या उच्च शिक्षण विभागात संयुक्त सचिव म्हणून कार्यरत आहेत.

### खडतर परिस्थिती

गोविंद जयस्वाल यांचे वडील नारायण रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचे. गोविंद सातवीत असताना त्यांच्या आईचे ब्रेन हेमरेजमुळे निधन झाले. तीन बहिणींसह त्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट होती. अशा परिस्थितीतही वडिलांनी मुलांचे शिक्षण थांबू दिले नाही. कष्ट करून आणि जमिनीचा तुकडा विकून त्यांनी गोविंद जयस्वाल यांना दिल्लीला शिक्षणासाठी पाठविले.

### प्रेरणेची ठिणगी

वयाच्या ११ व्या वर्षी गोविंद जयस्वाल यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी घटना घडली. मित्राच्या घरी खेळण्यासाठी गेले असता मित्राच्या वडिलांनी गोविंद जयस्वाल यांच्या वडिलांच्या रिक्षाचालक व्यवसायाबद्दल ऐकून त्यांना अपमानित करत घराबाहेर काढले. या अपमानाने गोविंद जयस्वाल हादरले. ओळखीच्या व्यक्तीने त्यांना समाजातील असमानता समजावली आणि सांगितले, की परिस्थिती बदलली नाही तर अशीच वागणूक मिळत राहील. याचवेळी गोविंद जयस्वाल यांना आयएएस ही देशातील सर्वोच्च सेवा असल्याचे कळले आणि त्यांनी वयाच्या ११ व्या वर्षी आयएएस अधिकारी होण्याचा निश्चय केला.

### संघर्ष आणि यश

गोविंद जयस्वाल यांनी वाराणसीतील सरकारी शाळा आणि हरिश्चंद्र विद्यापीठात गणिताचे शिक्षण घेतले. आर्थिक अडचणींमुळे यूपीएससीच्या तयारीसाठी त्यांच्याकडे जास्त वेळ नव्हता. दिल्लीत शिक्षणासाठी गेले असताना, वडिलांच्या पायाला दुखापत झाल्याने रिक्षा चालवणे बंद झाले. गोविंद यांनी खर्च भागवण्यासाठी ट्यूशन घेतल्या. अशा प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी मेहनत कायम ठेवली आणि 2006 च्या यूपीएससी नागरी सेवा परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात ४८ वा क्रमांक मिळविला.


**भावपुर्ण आदरांजली...**



**कै. भगवान ढोमण महाजन**

स्व.दि.13-11-2008

संस्थापक, चिटणीस महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळ अमळनेर

.... शोकाकुल....

ओमप्रकाश नारायणदास मुंदडा
अध्यक्ष

योगेश मधुसूदन मुंदडा
सचिव - मुंदडा फाऊंडेशन

पंकज गोविंद मुंदडा
चेअरमन, शाळा समिती

अशोक मोतीलाल दहाड, अभय किसनलाल सोनी, नरेंद्र नारायणदास मुंदडा, सौ.अनिता नरेंद्र मुंदडा, श्रीमती वैशाली शिरीष मुंदडा, राकेश गोविंद मुंदडा, विजय शिवनारायण अट्टल, सुनिल बन्सीलाल काबरा, अभिनय मुंदडा, अमेय मुंदडा, शुभम मुंदडा, श्रीमती सुनंदा भगवान महाजन (पत्नी), देवेंद्र भगवान महाजन (मुलगा), बाळकृष्ण ढोमण महाजन (भाऊ), हिंमत लाला देसले, काशिनाथआप्पा पाटील, सुरेश तुकाराम पाटील, ना. म. महाजन, गिरीषभाई शाह, सुनिलभाई सेठ, सुभाष कदम, सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी वृंद, महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळ, मुंदडा फाऊंडेशन,अमळनेर, स्व.पं. श्रीमती इंदिरा गांधी विद्या मंदिर, स्व. सौ. पद्मावती नारायणदास मुंदडा माध्य. विद्यालय, श्री नारायणदास तेजकरण मुंदडा प्राथ. विद्या मंदिर, श्री. नारायणदास तेजकरण मुंदडा माध्य व उच्च माध्य. विद्यालय, श्री एन. टी. मुंदडा ग्लोबल व्ह्यु स्कूल, स्व. श्री. मधुसुदन सुरजमल माध्य. विद्यालय, अमळनेर.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## जानवे शिवारातून चोरट्यांकडून महावितरणच्या वीजतारेची चोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील जानवे शिवारात चोरट्यांनी महावितरण कंपनीच्या खांबांसह ट्रान्स्फॉर्मरची तोडफोड करून मोठ्या प्रमाणात वीजतार चोरून नेली आहे. या घटनेत महावितरणचे सुमारे एक लाख ३१ हजार ३५७ रुपयांचे नुकसान झाले आहे.

या घटनेबाबत अमळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ अजित साखरलाल चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे, की शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी शेतकरी विनोद श्यामराव पाटील यांनी फोनवरून कार्यालयात माहिती दिली, की जानवे शिवारातील पोल्ट्री फॉर्मच्या पाठीमागील भागात विजेचे खांब तोडून खाली पडलेली वीजतार तसेच ट्रान्स्फॉर्मरमधील तार चोरट्यांनी नेली आहे. त्यानंतर अजित चव्हाण व त्यांचे सहकारी किशोर भीमराव पाटील यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यात रोहित्र क्र.४२३२७६५, ग्रुप नं. १८ येथील दोन सिमेंटचे खांब तोडून खाली पडलेले दिसून आले. तसेच एकूण १७ गाळ्यांवरील सुमारे ३४०० मीटर लांबीची ॲल्युमिनिअम तार चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. या घटनेचा पोलीस शिपाई कैलास शिंदे तपास करीत आहेत. दरम्यान, जानवे शिवारात वारंवार वीजतार चोरीचे प्रकार घडत असल्याने पोलिसांपुढे चोरट्यांचे आव्हान निर्माण झाले आहे.

# गलवाडेनजीक रस्त्याला पडल्या मोठ्या भेगा

## अपघाताचा धोका वाढल्याने नागरिकांमध्ये संताप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातून नरडाणा, शिंदखेडा, दोंडाईचाकडे जाणाऱ्या रस्त्याची अत्यंत धोकेदायक अवस्था झाली आहे. त्यात गलवाडेपासून पुढे जाणारा मुख्य रस्ता पूर्णपणे खराब झाला आहे.

सध्या त्यावर मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या आहेत. संपूर्ण रस्ता छिन्नविछिन्न झाला आहे. त्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांसाठी हा रस्ता अतिशय अडचणीचा ठरला आहे. हा रस्ता फक्त गलवाडेपुरता मर्यादित नसून पुढे तो अनेक गावांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे.

त्यामुळे दिवसभरातून शेकडो दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहने या मार्गावरून ये-जा करतात. मात्र, रस्त्याची छिन्नविछिन्न अवस्था पाहता कोणत्याही क्षणी तेथे मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सततच्या वाहतुकीमुळे आणि दर्जेदार काम न झाल्यामुळे सदर रस्त्याचे डांबरीकरण उखडले आहे.

पावसाळ्यानंतर भेगा अधिक वाढल्या आहेत. काही ठिकाणी सिमेंट निघून मोठे खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे दुचाकीस्वारांना तोल जाऊन अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. मात्र, संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्षच आहे. तरी या रस्त्याच्या दुरुस्तीकडे संबंधित विभागाने लक्ष देऊन वाहनचालकांसह पादचाऱ्यांना होणारा त्रास थांबवावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



(छायाचित्र : विशाल पाटील)

## प्रा. डॉ. वंदनाताई भामरे महात्मा फुले राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खान्देश शिक्षण मंडळ संचलित प्रताप कॉलेज (स्वायत्त)मधील गणित विषयाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. वंदनाताई पोपटराव भामरे यांना त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाबद्दल महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषदेमार्फत दिला जाणारा राष्ट्रीय महात्मा फुले राष्ट्रीय पुरस्कार (२०२५) देऊन सन्मानित करण्यात आले. रोख पन्नास हजार रुपये, प्रमाणपत्र, ट्रॉफी असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सदर पुरस्कार सोहळा २८ ऑक्टोबर २०२५ रोजी स्व. वि. दा. सावरकर नाट्यगृह, रत्नागिरी येथे झाला.



*अमळनेर येथील प्रताप महाविद्यालयातर्फे महात्मा फुले राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त प्रा.डॉ. वंदनाताई भामरे यांचा सत्कार करताना प्रभारी प्राचार्य डॉ.हर्षवर्धन जाधव आदी.*

या यशाबद्दल डॉ. वंदनाताई भामरे यांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, डॉ. विजय तुंटे, डॉ. धीरज वैष्णव, डॉ. अमित पाटील, ग्रंथपाल दीपक पाटील, डॉ. जितेंद्र पाटील, प्रा. विजय साळुंखे, कमलाकर पाटील, प्रा. रागिणी सैंदाणे, प्रा. सुचित्रा रत्नपारखी, प्रा. नेहा पाटील, महेंद्र चौधरी, मिलिंद नेवे, नितीन सोनार, सूरसिंग यांनी यथोचित सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले.







## पोलिस यंत्रणा सतर्क

पान १ वरून

केली जात आहे. निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार, अनधिकृत आर्थिक व्यवहार, तसेच दारू व इतर वस्तूंची अवैध वाहतूक रोखण्याच्या हेतूने ही मोहीम राबविली जात आहे. या संपूर्ण मोहिमेचे व्हिडिओ चित्रीकरण केले जात असल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली आहे. या मोहिमेसाठी दारूबंदी व महसूल विभागाच्या काही कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन संयुक्त पथके तयार करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले. या तपासणी मोहिमेदरम्यान नागरिकांनी संयम बाळगावा व कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेला सहकार्य करावे. काही संशयास्पद हालचाली आढळून आल्यास तत्काळ कळवावे. आगामी निवडणूक शांततेत पार पडाव्यात, यासाठी पोलीस दल सज्ज असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.
















अमळनेर येथील श्री मंगळग्रह मंदिरात श्री कालभैरव जयंतीनिमित्त बुधवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी आयोजित महायागाच्या पूर्णाहुतीनंतर महाआरती करताना भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा सौ. भैरवीताई पलांडे – वाघ शेजारी शुभम पाटील, मंगळग्रह सेवा संस्थेचे खजिनदार गिरीश कुलकर्णी यांच्यासह भाविक. दुसऱ्या छायाचित्रात वाढदिवसानिमित्त सौ. भैरवीताई पलांडे–वाघ यांचे मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे औक्षण करताना विश्वस्त श्रीमती जयश्रीताई साबे. शेजारी सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, ॲड. जी.एम. पाटील, ॲड. महेश काबरे, मोक्षदा वाघ आदी. (छायाचित्रे : नितेश बारी)

# श्री मंगळग्रह मंदिरात श्री कालभैरव महायाग

## रुद्राभिषेकासह श्री कालभैरवजी–श्री भैरवी माता पूजन, बलिदान, हवनाचे आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

येथील ख्यातनाम श्री मंगळग्रह मंदिर परिसरात विश्वातील एकमेव ‘ त्रिशुलात्मक स्थित ’ मंदिरातील श्री कालभैरवजी व श्री भैरवी माता यांच्या मूर्तींची गेल्या वर्षी प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर मंदिरात यावर्षी श्री कालभैरव जयंती अर्थात कार्तिक कृष्ण अष्टमीनिमित्त बुधवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी रुद्राभिषेकासह श्री कालभैरव महायाग अतिशय भक्तिमय आणि चैतन्यमय वातावरणात झाला. सुरूवातीला अमळनेर शहरातील कॉन्ट्रॅक्टर श्री. शुभम पाटील यांच्या हस्ते श्री कालभैरवजी–श्री भैरवी माता यांच्या मूर्तींवर रुद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर शुभम पाटील, भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा सौ. भैरवीताई वाघ–पलांडे, जळगाव येथील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. जी. एम. पाटील, मोक्षदा वाघ, निलेश महाजन या यजमानांच्या हस्ते संकल्प, गणपती पूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन आयुष्य मंत्र जप, नांदी श्राद्ध, आचार्य दिवरण, अग्नी स्थापन, द्वादश लिंगतोभद्र स्थापन, नवग्रह स्थापन, रुद्र स्थापन, नवग्रह हवन, श्री कालभैरवजी व श्री भैरवी माता हवन, रुद्र हवन, बेलफळाद्वारे श्री कालभैरवजी यांचे विशेष हवन, दशदिक्पाल बलिदान, चौसष्ट भैरवप्रीत्यर्थ विशेष मुख्य बलिदान होऊन पूर्णाहुती झाली. त्यानंतर महाआरतीच्या माध्यमातून महायागाची सांगता झाली. याप्रसंगी मंदिरात उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

मंदिराचे पुरोहित प्रसाद भंडारी, जयेंद्र वैद्य, तुषार दीक्षित, मंदार कुलकर्णी, अक्षय जोशी, वैभव लोकाक्षी, परशुराम शर्मा, यश जोशी, चंद्रकांत जोशी, निलेश भट यांनी पौरोहित्य केले. त्यांना गोपाळ पाठक व चेतन नाईक यांनी सहकार्य केले.

यावेळी मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त श्रीमती जयश्रीताई साबे, मुख्याधिकारी आर. जी. चव्हाण, ॲड. कैलास पवार, ॲड. महेश काबरे (एरंडोल), मंगल सेवेकरी सुनील गोसावी यांच्यासह भाविक व मंदिरातील सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुर्गाष्टमी : महिषासूर वधाचा उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देव आणि पृथ्वीवासीयांना हैराण करून सोडलेल्या महिषासूर राक्षसाचा वध करण्यासाठी अवतार घेतलेल्या माता दुर्गेने त्याच्याशी सतत आठ दिवस युद्ध करून त्याला ठार केले, तो दिवस दुर्गाष्टमी म्हणून साजरा करण्याची भारतात प्रथा आहे. या दिवशी माता दुर्गेबरोबरच तिच्या शस्त्रांचीही पूजा करण्याची पद्धत असन बंगाली लोकांमध्ये दुर्गापूजा हा प्रमुख सण म्हणून साजरा केला जातो. वीराष्मी असेही या दिवसाला संबोधले जाते. या दिवशी शस्त्र चालविणे, मार्शल आर्टचे खेळ मुद्दाम सादर केले जातात. कालिमाता या दिवशी माता दुर्गेच्या रूपात अवतरली असा भाविकांचा विश्वास आहे.



या दिवशी चौसष्ठ योगिनी आणि माता दुर्गेची रूपे असलेल्या अष्ट नायिकांचीही पूजा केली जाते. अष्टनायिका म्हणजे शक्तीचीच आठ रूपे मानल्या जातात. ब्राह्मणी, महेश्वरी, कामेश्वरी, वैष्णवी, वराही, नरसिंहिणी, इंद्राणी आणि चामुंडा ही ती अष्ट रूपे. भारतातील विविध धर्मांनुसार त्यांची पूजा केली जाते. बंगालप्रमाणेच भारतात अनेक राज्यांत माता दुर्गापूजेचा उत्सव साजरा केला जातो. सार्वजनिक मंडपात माता दुर्गेची मूर्ती स्थापन करून तीन दिवस हा उत्सव साजरा होतो. यावेळी मनोरंजनाचे अनेक कार्यक्रम आणि मेजवान्या दिल्या जातात. बंगालमध्ये दुर्गापूजेसाठी मूर्ती बनविताना काही नियम पाळले जातात. अक्षय्य तृतीयेलाच मूर्तीसाठी नदीकाठची पवित्र माती आणली जाते. गंगा नदीकाठची माती सर्वांत पवित्र समजली जाते. त्यानंतर कोलकत्यातील वेश्या वस्तीतून त्यांच्या दारापुढची एक मूठ माती आणून ती नदीकाठच्या मातीत मिसळून मग माता दुर्गेची मूर्ती घडविली जाते. माता दुर्गेची मूर्ती दहा बाहू असलेली आणि सर्व बाहूंत शस्त्रे धारण केलेली असते. त्याचबरोबर तिची चार बाळे आणि दोन सहाय्यक देवतांच्या मूर्तीही केल्या जातात. केळीचे झाड केले जाते. महिषासूर माता दुर्गेच्या पायाखाली दाखविला जातो. देवीचे नेत्र रंगविताना चक्षू दान नावाने एक विधी असतो. त्यात रंगकाम करणारे देवीचे नेत्र पूजेच्या आधी एक दिवस रंगवितात व त्या दिवशी ते उपवास करतात. संक्रातीप्रमाणेच माता दुर्गा कोणत्या वाहनावरून आली आणि कोणत्या वाहनावरून गेली, यावरून काही भाकिते वर्तविली जातात. उदा.– माता दुर्गा बोटीत बसून आली तर निसर्गाची देणगी मिळणार म्हणजे पीक–पाणी चांगले येणार, असे सांगितले जाते. दुर्गाष्टमीची पूजा झाल्यानंतर माता दुर्गेचे पाण्यात विसर्जन केले जाते.

# श्रीसूक्ताची देवता : माता लक्ष्मी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ऋग्वेदाच्या परिशिष्ट म्हणून समजल्या जाणाऱ्या श्रीसूक्ताची देवता ‘ श्री ’ म्हणजेच ‘ लक्ष्मी ’ होय. कारण श्रीसूक्तानेच लक्ष्मीची उपासना केली जाते. श्री किंवा लक्ष्मी ही संपत्तीची अधिष्ठात्री देवता. ही स्वयंप्रकाशी, हिरण्मयी, अश्व–रथ–गजादी संपत्तीची स्वामिनी, पद्मनिवासिनी आणि पद्ममाला धारण करणारी म्हणून प्रसिद्ध आहे. ही लक्ष्मी दारिद्र्याचा नाश करते. सर्व भूतांवर सत्ता चालविणारी लक्ष्मी मनाच्या इच्छा पूर्ण करते. वाणीच्या सत्याची प्राप्ती करून देते. कर्दम आणि चिक्लीत ही लक्ष्मीच्या पुत्रांची नावे श्रीसूक्तात निर्दिष्ट आहेत.

श्रीसूक्तातील प्रक्षिप्त म्हणून समजल्या जाणाऱ्या मंत्रांत माता लक्ष्मी यांचे विष्णूपत्नी, माधवप्रिया, अच्युतवल्लभा असे उल्लेख येतात. त्यांना महालक्ष्मी असेही म्हटले आहे. त्या भगवान विष्णुमनोनुकूला असून क्षीरसमुद्राच्या राजकन्या होत. धन, धान्य, धैर्य, शौर्य, विद्या, कीर्ती, विजय व राज्य अशा अष्टलक्ष्मी रूपांतही त्या पूजनीय मानल्या जातात. सिद्धलक्ष्मी, मोक्षलक्ष्मी, जयलक्ष्मी इत्यादी माता लक्ष्मीचीच रूपे आहेत. ऋग्वेदातील ज्ञानसूक्तात ‘ भद्रैषां लक्ष्मीर्निहिताऽधि वाचि ’ इत्यादी मंत्रांत एकप्रकारे वाग्लक्ष्मीचाच निर्देश केलेला दिसतो. वाणीचे भद्र सौंदर्य हीसुद्धा लक्ष्मीच. भागवत पुराणात भगवान विष्णू यांची शोभा, कांती म्हणजेच माता लक्ष्मी, असा निर्देश केलेला दिसतो.

वाजसनेयिसंहितेतील पुरुषसूक्ताच्या शेवटच्या मंत्रात मात्र ‘ श्रीश्च ते लक्ष्मीश्च पयौ ’ असा निर्देश आला आहे. त्यावरून ‘ पुरुष ’रूपी भगवान विष्णूंच्या श्री आणि माता लक्ष्मी या पत्नी होत्या, असा संदर्भ मिळतो. म्हणजेच श्री आणि माता लक्ष्मी यांच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या येथे निर्वाळा मिळतो. तैत्तिरीय उपनिषदात वस्त्र, गोधन, अन्न आणि पेय यांचा श्री म्हणजे माता लक्ष्मी असा निर्देश केला आहे. ब्रह्मवैवर्तपुराणाच्या प्रकृतिखंडात आणि गणेशखंडात लक्ष्मीच्या उत्पत्तिसंबंधी आणि रूपांबाबत असे सांगण्यात येते, की सृष्टीच्या प्रारंभी भगवान श्रीकृष्ण यांच्या शरीराच्या डाव्या भागापासून अतिसुंदर स्त्री निर्माण झाली. त्याच्याच इच्छेने ती स्त्री द्विधा झाली. तिच्या डाव्या शरीरभागापासून महालक्ष्मी आणि उजव्या शरीरभागापासून राधिका अशी दोन रूपे त्यांनी स्वीकारली. भगवान श्रीकृष्ण यांनीही दोन रूपे घेतली. त्यांच्या उजव्या भागापासून निर्माण झालेले रूप दोन हात असलेले, तर डाव्या भागापासून निर्माण झालेले शरीर चार हातांचे होते. राधिकेने द्विभूज भगवान श्रीकृष्ण यांना वरले, तर त्याच्या चतुर्भुज रूपाला माता लक्ष्मी यांनी माळ घातली. नंतर भगवान श्रीकृष्ण माता लक्ष्मींसह वैकुंठात राहू लागले. वैकुंठातील या माता लक्ष्मी यांना महालक्ष्मी अशी संज्ञा होती.



या महालक्ष्मींनी योगद्वारा नाना रूपे धारण केली. भगवान श्रीकृष्ण यांच्याबरोबर वैकुंठात त्यांनी रमेचे रूप धारण केले. स्वर्गात ती इंद्रैश्वर्यरूपी स्वर्गलक्ष्मी बनली. पाताळात व मर्त्यलोकात राजांच्या ठिकाणी राजलक्ष्मी म्हणून ती वास करू लागली आणि गृहातील गृहिणी म्हणून गृहलक्ष्मी बनली.

ज्या–ज्या वेळी भगवान विष्णू अवतार घेतात, त्या–त्या वेळी माता लक्ष्मीसुद्धा भगवान विष्णू यांच्या सहचारिणी होण्यासाठी अवतार घेतात. वामनावतारात त्यांनी पद्मेचा अवतार घेतला. परशुरामाच्या अवतारात त्यांनी धरणीचे रूप घेतले. रामावतारात त्या माता सीता बनल्या आणि भगवान कृष्णावतारात त्या माता रुक्मिणी यांच्या स्वरूपात अवतरल्या.

इंद्रैश्वर्यरूपी लक्ष्मी यांच्याबाबत पुढीलप्रमाणे कथा प्रचलित दिसते. दुर्वासांच्या शापाने इंद्र हा माता लक्ष्मी यांच्यापासून भ्रष्ट झाला. त्यामुळे स्वर्गलक्ष्मी वैकुंठात येऊन महालक्ष्मींत विलीन झाली. नंतर नारायणाच्या आज्ञेने स्वर्गलक्ष्मींच्या रूपातील लक्ष्मी क्षीरसागराची कन्या म्हणून जन्मास आली. देवदानवांनी क्षीरसागराचे मंथन केले. त्यातून उत्पन्न झालेल्या माता लक्ष्मी यांनी क्षीरसमुद्रावरील शेषशायी भगवान विष्णू यांना वरमाला अर्पण केली.

इहलोकी संपत्तीची आणि सौंदर्याची स्वामिनी असलेल्या माता लक्ष्मी दुःशील आणि अस्वच्छ व्यक्तींचा त्याग करतात. जेथे हरिपूजा आणि हरिकिर्तन होत नाही त्या स्थानाचा त्या त्याग करतात. कमळ, गज, सुवर्ण आणि बिल्वफळ ही माता लक्ष्मी यांच्या नित्य सान्निध्यात असतात.

माता लक्ष्मी यांची पूजा स्त्रीयांनी चैत्र, भाद्रपद व पौष मासांत विशेषतः करावी. दीपावलीतील अमावास्येस माता लक्ष्मी यांच्या पूजेचा विशेष विधी पुराणांत उल्लेखिलेला दिसतो. या दिवशी विशेषतः प्रदोषकाली माता लक्ष्मी यांची पूजा करावी.

# सत्संग



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सत्संगाच्या प्रभावाने संकटे जणू काही थिजून जातात. जोपर्यंत आपण सत्संगामध्ये आहोत ईश्वराचे संकीर्तन, भजन ईशकथा श्रवण करीत आहोत तोपर्यंत तेथे यमराज सुद्धा प्रवेश करू शकत नाहीत. जेथे साधू आहेत तेथे संकटे येऊ शकत नाहीत. जेथून साधू पुरुष – संत पुरुष दूर जातात तेथे अनर्थ घडू लागतो. मात्र जेथे संत आहेत, जेथे सत्संग आहे तेथे संकटे आली तरी ती निघूनही जातात. जसे– बर्फ कमळाच्या फुलाला थिजवून टाकते. तसेच सत्संगामुळे आपल्या आयुष्यात येणाऱ्या सर्व संकटांची ताकद निघून जाते. संकट हे संकट वाटत नाही. वाऱ्याने जसे धुके क्षणार्धात नष्ट होऊन समोरचे स्पष्ट दिसते. त्याप्रमाणे सत्संगामुळे विषयमोहाचे धुके क्षणार्धात नष्ट होते. सत्संगामध्ये विषयांचे आकर्षण, भोगासक्ती नाहीशी होते. म्हणून जगात सर्व संकटे आणि सर्व मोह यांना पराभूत करून विजयी होणारा सत्संगच आहे. असा हा सत्संग मनुष्याच्या बुद्धीचे वर्धन करतो.

अज्ञानरूपी वृक्षाचा समूळ छेद करतो आणि मनुष्याची सर्व मानसिक दुःखे नाहीशी करतो. त्यामुळे जेथे सत्संग आहे तेथेच बुद्धीचा विकास आहे. जसे– सूर्योदय झाल्यावर विश्वामधील अंधार नाहीसा करण्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागत नाहीत. सूर्योदय होताक्षणीच अंधार आपोआपच नाहीसा होतो. तसेच सत्संगामध्ये आपल्या बुद्धीमधील अज्ञानरूपी वृक्षाचा छेद होतो. शिष्याच्या अंतःकरणामधील अज्ञान ज्ञानशलाकेने नाहीसे करून जे शिष्याचा ज्ञानचक्षू उघडून देतात तेच खरे गुरू होत. इतकेच नव्हे तर मनुष्याला अनेक मानसिक व्याधी आणि या भवरोगाने जन्मानुजन्मे ग्रासले आहे. या सर्व दुःख, शोक, मोहात्मक रोगांचा नाश करावयाचा असेल तर सत्संग हे एकमेव महान औषध आहे.

